क्र. नाजिग्रा/वाह.शा/डी—३८/२०१७—९६
कार्यालय पोलीस अधिक्षक,
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर,
दिनांक :— १५ /०२/२०१७

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**संदर्भ** :—१) मा. अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. अपोमसं(वा)/४५/नियो./रस्ता सुरक्षा अभियान/२०१७/६९, मुंबई दि. ०७/०१/२०१७ अन्वये.

२) मा. अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. अपोमसं(वा)/४५/नियो./रस्ता सुरक्षा अभियान/कार्यक्रम आराखडा/२०१७/८९, मुंबई दि. १०/०१/२०१७ अन्वये.

**विषय** :— २८ वा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान—२०१७ बाबत सविस्तर अहवाल.

—oooooo—

**महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान—२०१७ अंतर्गत दि. ०९/०१/२०१७ ते २३/०१/२०१७ रोजी जिल्हा नागपूर ग्रामिण नागपूर येथे राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल पुढील प्रमाणे**

**दिनांक ०९/०१/२०१७**

नरसिंग शेरखाने, प्रभारी पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांचे हस्ते रस्ता सुरक्षा अभियान—२०१७ चे औपचारिकरित्या उद्घाटन पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जिल्हा (ग्रामीण) येथे संपन्न झाले. तसेच जिल्हयात पो.स्टे. निहाय मोहीम राबवून दुचाकी/चारचाकी/सायकल/बैलगाडी/ यांना परार्वतक (रिफ्लेक्टर) लाल रंगाच्या रेडीयम पट्टया लावण्यात येवून महत्वाच्या रहदारीवर वाहन चालकांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच महत्वाच्या वाहतूक वरदळीच्या ठिकाण प्रवाशांना व वाहनचालकांना अपघात टाळण्याबाबत तसेच सुरक्षतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १०/०१/२०१७**

१) पो.स्टे. सावनेर अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने मॉर्नींग स्टार कॉन्व्हेन्ट ॲण्ड जुनीअर कॉलेज येथे शालेय शिक्षकांची कार्यशाळा घेवून शिक्षकांना वाहतूक नियम पाळण्याबाबत व विद्यार्थ्यांना त्याबाबत मार्गदर्शन करण्याबाबत उद्बोधन करण्यात येवून उपस्थित १०० ते १५० विद्यार्थ्यांना वाहतूकीचे नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. २) पो.स्टे. कुही अंतर्गत ग्रामविकास ज्युनीअर कॉलेज कुही येथील विद्यार्थ्यांना वाहतूकीचे

नियम पाळण्याबाबत मार्गदशन केले. यामध्ये अंदाजे ३०० ते ४५० विद्यार्थी हजर होते ३) पो.स्टे. सावनेर अंतर्गत जवाहरलाल कन्या शाळा येथे विद्यार्थी व शिक्षकांची कार्यशाळा घेवून वाहतूकीचे नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ४) पो.स्टे. बोरी अंतर्गत एन एच–७ वरील ५० ते ६० वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले. ५) पो.स्टे. कोंढाळी अंतर्गत बाबाव्यास कॉलेज येथील विद्यार्थ्यांची रॅली काढून वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली.
**विशेष मोहिम :–** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, साईड मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक ११/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. खापरखेडा अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने ट्रक चालक तसेच इतर वाहन चालकांची चौक सभा घेवून रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियम व नियमनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे सुरक्षेबाबत सन २०१७ चे सुरक्षा दरम्यान घोषीत करण्यात आलेले ब्रीद वाक्यांचे ("Accident is painfull, Safety is gainfull" तसेच "Your Safety Secures Your Family-Be Cautions on Road") बाबतचे नमुद असलेले कार्ड वाटप करण्यात आले. २) पो.स्टे.कूही अंतर्गत नुतन कन्या हॉयस्कुल कुही येथील विदयार्थ्यांची कार्यशाळा घेवून तेथील विद्यार्थ्याना वाहतूक नियमांबाबत मागदर्शन केले. ३) पो.स्टे. सावनेर अंर्तगत वाहन चालकांची सभा घेवून त्यांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले. ४) पो. स्टे. एमआयडीसी बोरी अंतर्गत ट्रक चालकांना रस्ता सुरक्षा जानजागृतीबाबत माहिती पत्रके वाटप करण्यात आले. ५) पो.स्टे. कोंढाळी अंतर्गत कोंढाळी बस स्टॉप येथे ट्रक चालकांची सभा घेवून रस्ता सुरक्षेतेचे संदेश देण्यात आले तसेच वाहतूक नियमांबाबत मागदर्शन करण्यात आले. ६) पो.स्टे. काटोल अंतर्गत टोलनाका येथे रस्ता सुरक्षीतेबाबत स्लोगन छापून पत्रके वितरीत करण्यात आले.
**विशेष मोहिम :–** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, लेन कटींग, रॉग साईड मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १२/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. सावनेर अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने ऑटो चालक, ट्रक चालक व इतर सार्वजनिक वाहन चालक यांचे प्राथमीक आरोग्य केंद्र सावनेर येथे आरोग्यशिबीर आयोजीत करून त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र पारित करून तसेच स्वत:ची, प्रवाशांची वाहतूकी दरम्यान सुरक्षितता कशी करायची व स्वत:च्या कुटुंबीयांचे आरोग्य सांबाळण्याबाबत तसेच वाहतूक नियमांबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. वादवा, डॉ. सायली, डॉ. बरेडीया, डॉ. शेंबेकर यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन व जनजागृती करण्यात आली .२) पो.स्टे. एमआयडीसी अंतर्गत एमआयडीसी बोरी वाहन पार्कीग स्थळ इंडोरमा कंपनी गेट क्र. ५ समोर वाहन चालकांसाठी आरोग्य तपासनी शिबीर आयोजीत करून वाहन चालकांची आरोग्य तपासनी डॉ. सुर्यवंशी रा. टेंभरी यांचे नेतृत्वाखाली करण्यात आले. ३) पो.स्टे. कोंढाळी अंतर्गत वर्धा टी पॉईंट कोंढाळी येथे वाहन चालकांची सभा घेवून वाहतूक नियमांचे माहिती पत्रके वाटप करण्यात आले तसेच वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ४) पो.स्टे. काटोल अंतर्गत ॲटो चालकांना व इतर वाहन चालकांना नेत्र शिबीर बाबत माहिती देवून ग्रामीण रूग्नालय काटोल येथे आपले नेत्र तपासनी करून घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ५) पो.स्टे. रामटेक अंतर्गत मुख्य मार्गावार रस्ता सुरक्षतेबाबत बॅनर्स, वाहतूक नियमांचे पोस्टर्स लावण्यात आले.
**विशेष मोहिम :–** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, सीटबेल्ट, मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १३/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. खापरखेडा येथे, जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने ऑटो चालक, ट्रक चालक/मालक, यांची पारशिवनी फाटा येथे चौकसभा घेण्यात आली असुन सदर चौकसभेमध्ये ५० ते ६०

चालक/मालक उपस्थित असुन त्यांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पो.स्टे. कळमेश्वर अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियाना दरम्यान शालेय विद्यार्थ्यांची जनजागृतीपर रॅली काढण्यात आली २) पो.स्टे. पारशिवनी अंतर्गत राणी लक्ष्मीबाई विद्यालय येथे कार्यशाळा घेवून विद्यालयातील विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांनबाबत तसेच रोड सुरक्षतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ३) एमआयडीसी बोरी चौक येथे वाहन चालकांना वाहतूक नियमांबाबत माहिती पत्रके वाटप करण्यात आले. ४) पो.स्टे. काटोल येथे ट्रान्सपोर्ट वाहन चालक व मालकांची सभा घेवून अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व वाहतूक नियमांबाब मार्गदर्शन करण्यात आले. ५)पो.स्टे कुही अंतर्गत अवघृत कॉलेज कूही येथे विद्यार्थ्यांची सभा घेवून रोड सुरक्षतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, रॉग साईड मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १४/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. कळमेश्वर अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने श्री. गजानन ड्राईव्हींग स्कुल येथे प्रशिक्षक व विद्यार्थी यांची कार्यशाळा आयोजीत करून वाहतूक नियम व सुरक्षा बाबत घ्यावयाची दक्षता याबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात येवून सुरक्षेच्या नियमांचे कार्ड वाटप करण्यात आले. २) पो.स्टे. काटोल अंतर्गत काटोल येथील जारा ड्राईव्हींग स्कुल येथे शिकावू वाहन चालकांना वाहतूक नियमाबाबत व अपघात टाळण्यासठी घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ३) पो.स्टे. एमआयडीसी अंतर्गत टेंभरी चौक एमआयडीसी येथे ऑटो चालकांची सभा घेवून त्यांना वाहना चालवितांना घ्यावयाची दक्षता व रस्ता सुरक्षतेबाबत, वाहतूक नियमाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, सीटबेल्ट,हेल्मेट बाबत मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १५/०१/२०१७**

१) पो.स्टे. खापा अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने रिक्षा, टॅक्सी संघटनेच्या नेत्यांना कळवून तसेच पत्रके वाटून, चौकसभा घेवून वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शनपर उद्बोधन करण्यात आले. २) पो.स्टे. कोंढाळी अंतर्गत कोंढाळी येथे वाहन चालकांची नेत्रतपासणी करण्यासाठी नेत्रतज्ञ डॉ. वर्षा झाडे यांचे नेतृत्वाखाली नेत्रतपासणी शिबीर आयोजीत करण्यात आले. २)पो.स्टे. सावनेर अंतर्गत बस स्टॅन्ड चौक येथे वाहन चालकांची सभा घेवून त्याना वाहतूक नियमांबाबत मागदर्शन करून वाहतूक नियमांचे माहिती पत्रके वाटप करण्यात आली. ३) काटोल बस स्टॉप येथे टॅक्सी संघटना, ॲटो संघटना यांची सभा घेवून रोड अपघात टाळण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, सीट बेल्ट, ब्लॅक फ्लीम मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १६/०१/२०१७**

१) पो.स्टे. काटोल अंतर्गत काटोल येथील गळपूरा चौक येथे मोटरसायकल चालकांची सभा घेवून हेल्मेटचा वापर केल्यामुळे वाहन चालकांचा जिव कसा वाचतो याबत मार्गदशन करण्यात आले तसेच मद्यप्राशन करून वाहन न चालविण्याबाबत तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविल्यामुळे स्वत:च्या व दुसऱ्याच्या जिवीतास कसा धोका निमार्ण होतो याबाबत मागदर्शन करण्यात आले.२) पो.स्टे. कोंढाळी येथे हेल्मट वापरण्याबद्दल जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. ३) पो.स्टे. एमआयडीसी अंतर्गत वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले. तसेच ज्युनीअर कॉलेज टाकळघाट येथील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा बाबत घ्यावयाची दक्षता, हेल्मेट वापरण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे हद्दीतील रूग्नालय, ॲम्बुलन्स, क्रेन, पोलीस ठाणे ईत्यादीचे दुरध्वनी क्रमांक असलेले बोर्ड, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी महामार्गावर लावण्यात आले. तसेच पोलीस ठाणे हद्द दर्शविणारे बोर्ड सीमेवर लावण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, हेल्मेट बाबत, मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १७/०१/२०१७**

१) पो.स्टे. सावनेर अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने नगरपरिषद शाळा येथे शिक्षक तसेच आर.एस.पी. पथक यांचे कार्यक्रम आयोजीत करून २०० ते ३०० विद्यार्थ्यी यांना वाहतूक नियम व भविष्यात त्यांची वाहतूक नियमांबाबत नैतीक जबाबदारी कार्य याबाबत जनजागृतपर वाहतूक नियमांचे मार्गदर्शन करून मुलांचे गट तयार करून वाहतूक नियमांबाबत सवांद व वक्तृत्व स्पर्धा आयोजीत करण्यात आली. २) पो.स्टे काटोल अंतर्गत अरविंद विंडो इंग्लीश स्कुल काटोल येथील विद्यार्थ्यांनी पतनाट्य तयार करून आंबेडकर चौक काटोल येथे वाहतूक नियमांविषयी व अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता याबत जनजागृतपर पतनाट्य सादर केले. ३) काटोल येथील प्रवाश्यांना व वाहन चालकांना अपघात टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, रीफ्लेक्टर, नो पार्कींग मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १८/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. खापरखेडा अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने शंकरराव चौवळान ज्युनीअर कॉलेज, महाराष्ट्र विद्यालय व इतर उपलब्ध शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांना पो.स्टे. पटांगणात एकत्रीत करून वाहतूक वाहतूक नियम, सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करून मुलांच्या हाती विविध वाहतूक सुरक्षेबाबत फलक देवून व सरकारी पोलीस बॅन्ड पथक यासह रॅली काढून वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली. २)पो.स्टे. एमआयडीसी बोरी अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान अमर हायस्कुल व ज्युनीअर कॉलेज टाकळघाट, येथे “अपघातामुळे होणारे दुष्परीनाम व अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता ” या विषयावर निबंधस्पर्धा घेण्यात आली. सदर निबंध स्पर्धेमध्ये वर्ग ८,९, व १० वी च्या २०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. उत्कृष्ट निंबंध लिहीलेल्या स्पर्धकांना प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक देवून बक्षिसाकरिता निवड करण्यात आली. ३) पो.स्टे. काटोल येथील नगरपरिषद हायस्कुल काटोल, बिआर हायस्कल काटोल, माऊंट हायस्कुल काटोल, जिल्हा परिषद कन्या शाळा काटोल, जिल्हा परिषद मुलांची शाळा काटोल, केशवराव पवार हायस्कुल काटोल, सेंटपॉल हायस्कुल काटोल, नगर परिषद हायस्कुल काटोल, नबिरा महाविद्यालय काटोल ईत्यादी सर्व शाळेतील अंदाजे १००० ते १२०० विद्यार्थ्यांची जिल्हा परिषद ग्राऊंड काटोल येथुन रस्ता सुरक्षा सप्ताहबाबत जनजागृतपर रॅली काटोल शहरातून काढण्यात आली. सदर रॅलीचे समारोप सभा नगपरिषद शाळा २ येथे घेण्यात आली. सदर सभेत वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, सीटबेल्ट,हेल्मेट, रॉग साईड बाबत मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक १९/०१/२०१७**

१) पो.स्टे. उमरेड अंतर्गत दुचाकी वाहन चालकांची सभा घेवून हेल्मट वापरण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. २) भिवापुर येथील विद्या निकेतन स्कुल येथे रस्ता सुरक्षा मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.
**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक २०/०१/२०१७**

१) कळमेश्वर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ गोंडखैरी टोलनाका येथे वाहतूक नियमांचे माहिती पत्रके वाटप करण्यात आली. तसेच महत्वाच्या रहदारीच्या ठिकाणी पोस्टर्स लावण्यात आले. २) इंदिरा गांधी विद्यालय कन्हान येथे विदयार्थ्यांना वाहतूक नियमांबाबत संबोधन करण्यात आले. ३) काटोल परिसरातील वाहन चालकांना आपल्या वाहनामध्ये प्रथमोपचार पेटी बाळगण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाहन चालकांना वाहतूकीबाबत माहिती देण्यात आली. वाहतूकीच्या नियमाबाबत वाहन चालकांना व इतर व्यक्तींना पत्रके वाटप करण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, फॅन्सी नबरप्लेट, लेन कटींग, रिफ्लेक्टर मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक २१/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. मौदा अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण च्या वतीने जनता विद्यालय मौदा येथे २०० ते ३०० विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षा बाबत मार्गदर्शन करण्यात आले. २) पो.स्टे. कन्हान अंतर्गत कन्हान येथील नारायण विद्यालयातील विदयार्थ्यांना वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत व लायसन्स बाबत माहिती देण्यात आली. ३)काटोल येथील माउंट कॉन्वेट स्कुल बस चालकांची वाहतूक नियमाबाबम प्रबोधनपर कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. ४) पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत वाहतूक नियमांबाबत पत्रके वाटप करण्यात आली. तसेच वाहन चालकांची बसस्टॅड येथे सभा अयोजीत करून त्याना अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता याबाबत तसेच वाहतूकीचे नियम पाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, ब्लॅक फ्लीम, हेलमेट मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक २२/०१/२०१७**

१) पो.स्टे. रामटेक अंतर्गत ॲटो व इतर वाहना चालकांची रामटेक बस स्टॅड येथे सभा आयोजीत करून मद्यप्राशन करून वाहन चालविण्यामुळे होणारे दृष्परीनाम याबाबत मार्गदर्शन तसेच वाहतूक नियम पाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.२) पो.स्टे. कोंढाळी अंतर्गत वर्धा टी पॉईट कोंढाळी येथे वाहन चालकांची सभा घेवून वाहतूक नियमांचे माहिती पत्रके वाटप करण्यात आले. ३) पो.स्टे. रामटेक अंतर्गत मुख्य मार्गावार रस्ता सुरक्षतेबाबत बॅनर्स, वाहतूक नियमांचे पोस्टर्स लावण्यात आले.

**विशेष मोहिम :—** अवैध प्रवासी वाहतूक, ड्रंकनड्राईव्ह, रॉग साईड मोवाका अंतर्गत इत्यादी केसेसची विशेष मोहिम राबविण्यात आली.

**दिनांक २३/०१/२०१७**

**१)** पो.स्टे. कळमेश्वर अंतर्गत एनआयटी पॉलीटेक्नीक कॉलेज फेटरी येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाहतूक नियमांबाबत तसेच अपघात व त्यावरील उपाययोजना या संबंधाने विषय देवून चित्रकला स्पर्धा आयोजीत करण्यात आली. यात कॉलेजचे प्राचार्य, प्रादेशिक परिवहन विभाग, नागपूर ग्रामीण, संस्थापक जिवन सुरक्षा प्रकल्प (एन.जी.ओ) यांच्या सहकार्याने वरील कार्यक्रम संपन्न करून स्पर्धेत उत्कृष्ट चित्रकरणाला प्रशस्तिपत्र व रोख बक्षीस वितरीत करण्यात आले. त्याचप्रमाणे रस्ता सुरक्षा अभियांतर्गत अपघातग्रस्त व्यक्तींना तातडीने मदत व उपचाराबाबत मा. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालास प्रत्येक कार्यक्रमाच्या ठीकाणी प्रसिद्धी देवून त्या माध्यमातुन जनजागृती करण्यात आली. तसेच वाहतूक नियमांबाबत वाहतूक नियमांचे पालन कण्यासाठी संकल्पनात्मक प्रतिज्ञा करण्यात आली. उपस्थितांकरिता अल्पोउपहाराचे आयोजन करून रस्ता सुरक्षा सप्ताहाची प्रसिद्धी माध्यमांना माहिती देवून सांगता करण्यात आली.

त्याचप्रमाणे रस्ता सुरक्षा अभियान—२०१७  दरम्यान मोटार वाहन कायदया नुसार करण्यात आलेल्या केसेस दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे सादर आहे.

**दिनांक ०९/०१/२०१७ ते २३/०१/२०१७ पर्यंत रस्ता सुरक्षा अभियान दरम्यान मोटार वाहन कायदाप्रमाणे करण्यात आलेल्या केसेस बाबत अहवाल**

| दिनांक | कलम 66/192 अवैध प्रवासी वाहतूक | कलम 185 ड्रंकन ड्राईव्ह | क्लम 112/183 ओअर स्पीड | कलम 119/17 7 रॉंग साईड | कलम 18 आरआरआर लेन कटींग | कलम 138(3) /177 सीटबेल्ट | कलम 129/177 हेल्मेट | कलम 100(2)/1 77 ब्लॅक फ्लीम | कलम 104/177 रीफ्लेक्टर | कलम 122/177 नोपार्कींग | कलम 50,51 (1)/177 फॅन्सी नंबर प्लेट | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/०१/२०१७ | १७ | ०५ | — | — | — | — | — | — | — | — | — | ६९ |
| १०/१/२०१७ | ११ | १० | ०१ | १० | — | — | — | — | — | — | — | ९६ |
| ११/०१/२०१७ | १९ | १९ | ०० | ३७ | — | — | — | — | — | — | — | १०१ |
| १२/०१/२०१७ | २३ | १४ | — | — | — | ४३ | — | — | — | — | — | ८६ |
| १३/०१/२०१७ | २७ | १३ | — | २९ | — | — | — | — | — | — | — | १०९ |
| १४/०१/२०१७ | १७ | ११ | — | — | — | ६० | ०२ | — | — | — | — | १०२ |
| १५/०१/२०१७ | १७ | १६ | — | — | — | ४१ | — | ०९ | — | — | — | ८८ |
| १६/०१/२०१७ | २२ | २० | — | — | — | — | ०१ | — | — | — | — | १५४ |
| १७/०१/२०१७ | १२ | १९ | — | — | — | — | — | — | ०१ | ४० | — | १२३ |
| १८/०१/२०१७ | १४ | १६ | — | ४२ | — | २७ | ०१ | — | — | — | — | ११२ |
| १९/०१/२०१७ | २० | १७ | — | — | — | — | — | — | — | — | — | २०७ |
| २०/०१/२०१७ | १४ | १७ | — | — | ०६ | — | — | — | ०१ | — | ०४ | १६५ |
| २१/०१/२०१७ | १२ | १० | — | — | — | — | ०४ | १४ | — | — | — | १८१ |
| २२/०१/२०१७ | १४ | ११ | — | ३४ | — | — | — | — | — | — | — | १३६ |
| २३/०१/२०१७ | १३ | १७ | — | — | — | — | — | — | — | — | — | १८३ |
| **एकुण** | **२५२** | **२१५** | **०१** | **१५२** | **०६** | **१७१** | **०८** | **२३** | **०२** | **४०** | **०४** | **१९१२** |

वरिल प्रमाणे दि. ०९/०१/२०१७ ते २३/०१/२०१७ पावेतो इकडील जिल्हयाअंतर्गत यशस्विरीत्या २८ वा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान—२०१७ राबवून जन सामान्यात वाहतूक नियमांचे महत्व व त्याची आज नितीस गरज लक्षात ठेवून योग्य ती जनजागृती करण्यात आली. अशा प्रकारे रस्ता सुरक्षा अभियान—२०१७ मध्ये विविध कार्यक्रम आयोजीत करून जास्तीत—जास्त प्रसार माध्यमांना माहिती देवून अभियानाची सांगता करण्यात आली.

**(शैलेश बलकवडे)**
पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर


पोलीस स्टेशन सावनेर
दिनांक : १७/०१/२०१७
रस्ता सुरक्षा सप्ताह
जिल्हा नागपूर ( ग्रामीण )


रस्ता सुरक्षा सप्ताह
पोलीस स्टेशन खापरखेडा
जिल्हा नागपूर (ग्रामीण)
दि. ०९/०१/२०१७ ते दि. २३/०१/२०१७ पर्यंत


पोलीस स्टेशन खापरखेडा
जिल्हा नागपूर (ग्रा.)
रस्ता सुरक्षा सप्ताह
पोलीस स्टेशन खापरखे
जिल्हा नागपूर (ग्रामीण)


रस्ता सुरक्षा सप्ताह
दि.१।१।२०१७ ते २३।१।२०१७ पर्यंत.
पोलीस स्टेशन काटोल.


नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस
रस्ता सुरक्षा अभियान-२०१७
९ जानेवारी ते २३ जानेवारी २०१७
जिल्हा वाहतुक शाखा (ना.ग्रा.)


नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस
रस्ता सुरक्षा अभियान-२०१७
९ जानेवारी ते २३ जानेवारी २०१७
जिल्हा वाहतुक शाखा (ना.ग्रा.)